INDIAN NATIONAL CONGRESS

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी

टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०२५.
Email - office@mahacongress.com

दुरध्वनी -२४२३३०००
२४३०१३०१
२४३०१३६९
फॅक्स - २४२२५७३३

जावक क्र. ६२० /२०२३

दि. ४ ऑक्टोबर, २०२३

प्रति,
मा. श्री. रमेशजी बैस,
महामहिम राज्यपाल
महाराष्ट्र राज्य,मुंबई

विषय:- राज्यातील स्पर्धा परीक्षा उमेदवारांच्या अडचणी व समस्स्यांबाबत.

महोदय,

राज्यातील स्पर्धा परिक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी विनंती केल्यावरून त्यांना न्याय मिळावा यासाठी खालील बाबींचा गांभीर्याने विचार व्हावा, ही विनंती.

१. महाराष्ट्रात पेपरफुटी व कॉपीविरोधी कठोर शिक्षेची तरतूद असणारा कायदा करणेबाबत.

मुंबई पोलीस भरती, वनविभाग, तलाठी भरती तसेच एमपीएससी परीक्षेत पेपरफुटी व कॉपी संदर्भात अनेक गैरप्रकार उघडकीस आले आहेत. महाराष्ट्रात अस्तित्वात असलेल्या पेपरफुटी विरोधी कायद्यात कठोर शिक्षेची तरतूद नाही. त्यामुळे अक्षरशः टोळ्या बनवून प्रश्नपत्रिका फोडल्या जात आहेत. ज्यांच्यावर पेपरफुटीचे गुन्हे दाखल आहेत, ते उमेदवार पुन्हा पुन्हा दुसऱ्या परीक्षांचे पेपर बिनधास्तपणे फोडत आहेत. त्या टोळीची कॉपी व पेपरफुटीसाठी असलेली हायटेक यंत्रणा व मोडस ऑपरेन्डी धक्कादायक आहे. असे उमेदवार प्रत्येक भरतीत निवडले जात आहेत . यामुळे गोरगरीब उमेदवार रात्रंदिवस अभ्यास करून सुद्धा मागे पडत आहेत.

आपणास नम्र विनंती करतो, राजस्थान व उत्तराखंड राज्याप्रमाणे कठोर कायदा महाराष्ट्रात लवकरात लवकर व्हावा यासाठी आपण याचा गांभीर्याने विचार करावा.

INDIAN NATIONAL CONGRESS

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी

टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०२५.
Email - office@mahacongress.com

दुरध्वनी -२४२३३०००
२४३०१३०१
२४३०१३६९
फॅक्स - २४२२५७३३

२. सरळसेवा भरती खाजगी कंपन्यामार्फत न घेता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडूनच करणेबाबत.

राज्य सरकारच्या आशीर्वादाने खाजगी कंपन्यांकडून प्रत्येक भरती प्रक्रियेत 1000 रुपये फी च्या नावाखाली गोरगरीब विद्यार्थ्यांची लूट केली जात आहे. हा एक प्रकारचा भ्रष्टाचार आहे. आपणास विनंती करतो या सर्व परीक्षा एमपीएससी कडे देण्याचा निर्णय घेऊन लाखो उमेदवारांना न्याय व दिलासा द्यावा. त्याद्वारे भरती पारदर्शक तर होईलच सोबत गोरगरीबांची लुट न होता त्यांना नोकरीची संधी प्राप्त होईल.

३. न्यायालयीन प्रक्रियेत अडकलेल्या एमपीएससी परीक्षार्थींना नियुक्ती देण्याबाबत.

महाराष्ट्र राज्यसेवा आयोगाद्वारे निवड झालेले अनेक उमेदवार वेगवेगळे शासन धोरण व आरक्षण किंवा इतर काही कारणामुळे न्यायालयीन प्रक्रियेत अडकले आहेत. अशा उमेदवारांना न्यायालयीन निकालाच्या आधिनराहून नियुक्ती देण्यात यावी.

४. शासकीय पदभरतीचे कंत्राटीकरण त्वरित रद्द करावे व या संबधीचा दि. 6 सप्टेंबर 2023 चा शासन निर्णय मागे घेण्याबाबत.

कायमस्वरूपी शासकीय नोकरीच्या आशेने राज्यातील लाखो उमेदवार स्पर्धा परीक्षांची तयारी करत असतात. नुकताच शासनाने बाह्ययंत्रणेच्या माध्यमातुन मनुष्यबळ घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार वेगवेगळ्या जाहिराती निघत आहेत. या निर्णयामुळे राज्यातील होतकरू, गुणवत्ताधारक, ग्रामीण युवक संकटात सापडले आहेत. सोबतच या भरतीप्रक्रियेत कोणतेहीं आरक्षण नसल्याने कल्याणकारी राज्याच्या सामाजिक न्यायाच्या मुख्य भूमिकेला तडा जात आहे, हे एक प्रकारे राज्यघटनेचे उल्लंघनच आहे.

आपण त्वरित यात हस्तक्षेप करून ही कंत्राटी भरती थांबवावी व संबंधित शासन निर्णय मागे घेण्यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करावी.

INDIAN NATIONAL CONGRESS

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी

टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०२५.
Email - office@mahacongress.com

दुरध्वनी -२४२३३०००
२४३०१३०१
२४३०१३६९
फॅक्स - २४२२५७३३

५. सार्वजनिक बांधकाम विभागातील कनिष्ठ अभियंता गट - ब अराजपत्रित (अभियांत्रिकी) पदाचे नवीन सेवाप्रवेश नियम तातडीने जाहीर करणेबाबत

या पदाची भरती 1 जाने 1998 शासननिर्णयानुसार होते. ज्याद्वारे उच्चशिक्षण असलेल्या उमेदवारांना विनाकारण डावलले जात आहे. या शासन निर्णयात बदल करण्यासाठी अनेक समित्या स्थापन केल्या आहेत. त्यानुसार त्यांनी शासनाला प्रस्ताव दिला आहे. परंतु आजतागायत यावर काहीही कार्यवाही झालेली नाही. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची दि. 28/02/2023 रोजी सार्वजनिक बांधकाम विभाग नवीन सेवाप्रवेश नियमासंदर्भात सहमती प्राप्त झालेली आहे. दि. 9 सप्टेंबर 2021 सुधारित सेवा प्रवेश नियम संदर्भातील शासन निर्णयानुसार उच्चशिक्षण हा अडसर असता कामा नये, त्यांना संधी नाकारण्याचा प्रश्नच उद्दभवत नाही. मग हा भेदभाव फक्त या उमेदवारांच्या बाबतीतच का असावा ? हजारो अभियंता यात बदल व्हावेत म्हणून वर्षानुवर्ष न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत.

आपणास नम्र विनंती करतो, इतर राज्याचा आदर्श घेऊन हे सेवाप्रवेश नियम तातडीने बदलण्यासंदर्भात योग्य ती कार्यवाही व्हावी.

६. कमी पटसंख्येच्या नावाखाली शाळा बंद करून "दत्तक शाळा योजना" व "समूह शाळा हे शिक्षण हक्काची पायमल्ली करणारे जाचक निर्णय तातडीने मागे घेणे बाबत.

ग्रामीण , दुर्गम भागात अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशी झगडत गोरगरीब, आदिवासी विद्यार्थी शिक्षण घेत असतात. या शाळाच बंद केल्यामुळे या मुलांचे विशेषतः मुलींचे शिक्षण थांबण्याचा धोका आहे. शिक्षणाचे सार्वत्रीकरण करण्याचे सोडून त्यांचा हक्कच हिरावून घेतला जात आहे. वास्तविक शिक्षणावरील खर्च ही प्रत्यक्षात भावी पिढी घडविण्यासाठीची गुंतवणूक असते. त्याकडे सरकारचा खर्च किंवा ओझे म्हणून पाहण्याचा दृष्टीकोन अत्यंत चिंताजनक व भयावह आहे. ज्या महाराष्ट्रात शिक्षणासाठी आयुष्य खर्च

INDIAN NATIONAL CONGRESS

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी

टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०२५.
Email - office@mahacongress.com

दुरध्वनी -२४२३३०००
२४३०१३०१
२४३०१३६९
फॅक्स - २४२२५७३३

केलेले अनेक समाजसुधारक जन्माला आले, त्यात महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या राज्यात असे निर्णय घेणे हे धक्कादायक व लज्जास्पद आहे. या गोरगरीब विद्यार्थ्यांची भावी पिढी घडविण्यासाठी शासनाने याच सरकारी शाळेत चांगल्यात चांगल्या सुविधा कशा पुरविता येतील यासाठी प्रयत्न करावे.

(नाना पटोले)
प्रांताध्यक्ष

(अरिफ नसीम खान)
प्रदेश कार्याध्यक्ष

(वजाहत मिर्झा)
विधानपरिषद सदस्य

(धिरज लिंगाडे)
विधानपरिषद सदस्य

(देवानंद पवार)
सरचिटणीस
संघटन व प्रशासन

(अतुल लोंढे)
प्रदेश मुख्य प्रवक्ता

A.P. Gavkali
आदित्य गवळी
8422990025

वैभव गाढवे
9130803599

Ganesh Gondal
गणेश गोंडाळ
9075873897

Dr. Anjali Thakare
8999369583

Trimbak S. Hippargekar
9823207575